# ‘स्वप्ननिकेतन’ने हक्काच्या घराची स्वप्नपूर्ती

## मौजा वांजरा येथे ४८० सदनिका

**नागपूर.** नागपूर महानगरपालिकेच्या झोपटपट्टी पुनर्वसन प्राधिकरणद्वारे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मौजा वांजरा, कामठी रोड येथे ‘स्वप्ननिकेतन’ प्रकल्प पूर्णत्वास येत आहे. या प्रकल्पामुळे अनेकांच्या हक्काच्या घराची स्वप्नपूर्ती होणार आहे.

मौजा वांजरा, कामठी रोड येथील ‘स्वप्ननिकेतन’ प्रकल्पामधील ४८० सदनिकांकरिता ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते व ईश्वर चिठ्ठीद्वारे घरांचे आवंटन देखील करण्यात आले. ‘स्वप्ननिकेतन’ प्रकल्पाच्या माध्यमातून अनेक गरजूंचे हक्काच्या घराचे स्वप्न साकार होणार आहे. या प्रकल्पाचे कार्य सुरू असून या प्रकल्पांतर्गत ४८० सदनिकांची निर्मिती केली जात आहे. यामध्ये २८.२१ चौ.मी./३०३.६५ चौ.फुट चटई क्षेत्रफळ असलेले 1BHKसदनिका आहेत. सदनिकेची एकूण किंमत ११,५१,८४५ एवढी असून प्रधानमंत्री आवास योजनेमार्फत शासनातर्फे २,५०,००० रुपये अनुदान असून सदनिकेचे विक्री मूल्य ९,०१,८४५ रूपये आहे.

प्रकल्पातील ४८० सदनिकांमध्ये ५० टक्के अर्थात २४० सदनिका अराखीव असून १३ टक्के अनुसूचित जाती, ७ टक्के अनुसूचित जमाती, ३० टक्के इतर मागास प्रवर्ग आणि ५ टक्के – समांतर आरक्षण दिव्यांग प्रवर्गाकरिता राखीव आहेत. प्रकल्पामध्ये बाग, कम्यूनिटी हॉल, लॉबी, लिफ्ट आणि पाणी पुरवठा करणा-या पंपला लागणा-रा वीज निर्मितीसाठी सोलर पॅनलची सुविधा, सौर उर्जेमार्फत गरम पाण्याची सुविधा, पर्जन्य जलसिंचन प्रकल्पाची सुविधा, जलनि:स्सारण प्रकल्पाची सुविधा आहे.